# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-४११००४

परिपत्रक क्रमांक रा.मं/पापुअ/पापुई/संशोधन/इ. १२ वी
मूल्यमापन आराखडा/वेबसाईट/३७८९, दिनांक-०४/०९/२०२०.

**संदर्भ:** १) शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१९/प्र.क्र.(२४३/१९)/एसडी-४, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२, दि.०८ ऑगस्ट २०१९.
२) परिपत्रक क्रं.रा.मं./पापुअ/पापुई/संशोधन/इ.११वीची विषय योजना व सुधारित मूल्यमापन योजना/४२४१, दि.१६/०८/२०१९.
३) शासन पत्र क्र.संकीर्ण ०८२०/प्र.क्र.११६/एसडी-२, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२, दि.०२ सप्टेंबर २०२०.

**विषय:** इ.१२ वीच्या PCBM गट ('भौतिकशास्त्र', 'रसायनशास्त्र', 'जीवशास्त्र'व 'गणित आणि संख्याशास्त्र')या विषयांचे सुधारित मूल्यमापन आराखडे, घटकनिहाय गुणविभागणी व अंतर्गत मूल्यमापन योजना इत्यादींबाबत.....

या परिपत्रकान्वये राज्यातील सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना कळविण्यात येते की, इयत्ता १२ वी च्या पुनर्रचित अभ्यासक्रमाची व नवीन पाठयपुस्तकांची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून सुरु करण्यात आलेली आहे. तसेच इयत्ता १२वी च्या PCBM गट ('भौतिकशास्त्र', 'रसायनशास्त्र', 'जीवशास्त्र' व 'गणित आणि संख्याशास्त्र') या विषयांच्या सुधारित मूल्यमापन योजनेची अंमलबजावणीही शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून सुरु करण्यात आलेली आहे.

संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयाव्दारे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून इयत्ता १२ वीची सुधारित मूल्यमापन योजना निश्चित करण्यात आलेली आहे. मंडळाने विषयतज्ज्ञांमार्फत शासन निर्णयातील निर्देशानुसार तयार केलेली तपशीलवार मूल्यमापन योजना, घटकनिहाय गुणविभागणी व अंतर्गत मूल्यमापन योजना यास संदर्भ क्र.३ च्या पत्रान्वये शासनाने मान्यता प्रदान केलेली आहे.

उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे निश्चित केलेल्या सुधारित मूल्यमापन योजना व तदनुषंगीक बाबींना अनुसरुन राज्य मंडळामार्फत विषयनिहाय ऑनलाईनव्दारे प्रशिक्षण नजीकच्या काळात आयोजित करण्यात येणार आहे. या प्रशिक्षणात विषय शिक्षकांना विषयनिहाय मूल्यमापन आराखडे व अन्य तपशील अवगत करुन देण्यात येणार आहेत. उपरोक्तप्रमाणे शासन मान्यताप्राप्त इ.१२ वीचे मूल्यमापन आराखडे, घटकनिहाय गुणविभागणी व अंतर्गत मूल्यमापन योजना या परिपत्रकासह मंडळाच्या www.mahahsscboard.maharashtra.gov.in वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

२....

वरील सर्व सूचना आपल्या विभागातील मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचे मुख्याध्यापक/प्राचार्य, सर्व शिक्षक, विद्यार्थी, पालक व सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून दयाव्यात. सदर परिपत्रकात दर्शविलेल्या मूल्यमापन आराखड्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

आदेशान्वये.

(डॉ. अशोक भोसले)
सचिव
राज्यमंडळ, पुणे ०४

क्र.कोविमं/12वी/सु.मु.यो/ 5055
कोल्हापूर.
दि.21/09/2020

प्रति,
प्राचार्य,
सर्व कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा / सांगली / कोल्हापूर.

उपरोक्त दर्शविलेल्या परिपत्रकान्वये सर्व सुचनांची नोंद घेऊन सुधारित मुल्यमापन आराखड्याबाबत सर्व शिक्षक, विद्यार्थी, पालक व सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्याची कार्यवाही करावी.

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.